| 2003 IV 27 1100 | **0101** | बैठक क्र. 4 6 7 0 6 |
|---|---|---|

# VSA (मराठी माध्यम)

**प्रश्नपत्रिका क्र. I भाषा (मराठी) व सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल)**

**वेळ : 11 A.M. ते 12 Noon**

**पृष्ठ : 8**

**एकूण गुण : 100**

**सूचना :—**

(1) या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रत्येकी **दोन** गुणांचे **50** प्रश्न आहेत.

(2) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(3) उत्तरे लिहिण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. पर्याय क्र. 1, 2, 3, 4 असे इंग्रजीत आहेत. त्यापैकी एकच पर्यायी उत्तर योग्य आहे. उत्तराचा योग्य पर्याय उत्तरपत्रिकेत चौकटीमध्ये इंग्रजी अंकात लिहावा. जसे [2].

(4) शक्यतो खाडाखोड करु नये.

(5) उत्तराची दुरुस्ती करताना चौकोनातील उत्तर क्रमांकावर [3] अशा प्रकारे तीन आडव्या रेषा माराव्या व बदललेल्या उत्तराचा पर्याय क्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूस लिहावा. जसे [3] 2.

(6) उत्तराची दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी एकदाच मान्य होईल.

(7) पाचपेक्षा जास्त दुरुस्त उत्तरे नोंदविल्यास अशा जादा दुरुस्त्यांना गुण दिले जाणार नाहीत.

(8) एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसल्यास त्यासाठी रेंगाळू नका.

(9) प्रश्नपत्रिकेतील भाग I मध्ये **35** प्रश्न भाषेचे आहेत आणि भाग II मध्ये **15** प्रश्न सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल) आहेत.

## भाग I

### भाषा (मराठी)

**प्र. 1 ते 3 : खालील उतारा वाचा. त्या खालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा :**

मधमाश्यांचे घर तुम्ही पाहिले आहे का ? या घराला पोळे किंवा मोहोळ म्हणतात. या घराची प्रत्येक खोली अष्टकोनी असते. त्यातील कोणत्याही दोन खोल्यांच्या भिंती मोजून पहा. त्या अगदी सारख्या असतात. मधमाश्यांचे हे अजब घर पाहिले म्हणजे त्यांच्या अंगच्या कलाकौशल्यांचे फारच आश्चर्य वाटते. शेकडो अष्टकोनी खोल्या असलेले हे घर मधमाश्यांनी नेहमी गजबजलेले असते. काही माश्या बांधकाम करत असतात, तर काही दूरदूरच्या फुलांतील मध गोळा करून आणीत असतात.

1. मधमाश्यांच्या घराला काय म्हणतात ?

(1) जाळी (2) पोळे

(3) बीळ (4) राळे

2. मधमाश्यांच्या घराच्या खोल्या किती कोनांच्या असतात ?

(1) अष्टकोनी (2) पंचकोनी

(3) त्रिकोणी (4) षट्कोनी

3. वरील उताऱ्यात कशाचे वर्णन केले आहे ?

(1) मधमाश्यांचे (2) मधमाश्यांच्या कौशल्याचे

(3) मधमाश्यांच्या कामाचे (4) मधमाश्यांच्या घराचे

**प्र. 4 ते 6 : खालील कविता वाचा व त्या खालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा :**

माझा, माझा हिंदुस्थान !

हिमाचलाचे हीरकमंडित शिरभूषण भरदार<br>
वक्षावर गंगायमुनांचे रूळती मौक्तिक हार<br>
कटीस तळपे मराठमोळ्या गोदेची तलवार<br>
महोदधीचे चरणाजवळी गर्जतसे आव्हान<br>
माझा हिंदुस्थान.

पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी
गळ्यामध्ये गरिबांच्या गाजे संतांची वाणी
ज्योतीसम समरात जळाली झाशीची राणी
त्या संताचे, त्या वीरांचे प्रियतम तीर्थस्थान
माझा हिंदुस्थान.

4. गरिबांच्या गळ्यात कोणाची वाणी गाजत असते ?
(1) झाशीच्या राणीची (2) देशभक्तीची
(3) समतेची (4) संतांची

5. भारतीय वीर पुरुषांचे तीर्थस्थान कोणते ?
(1) हिमालय पर्वत (2) झाशीची राणी
(3) हिंदुस्थान (4) शिवाजी महाराज

6. 'समुद्र' या अर्थाने कवितेत कोणता शब्द आला आहे ?
(1) कटी (2) महोदधी
(3) गंगायमुना (4) गोदा

7. खालील वाक्य कोणत्या शब्दाने पूर्ण होईल ?
विद्यार्थी मैदानावर कबड्डी.................................
(1) खेळतात (2) उत्कृष्ट
(3) खो खो (4) आनंदाने

8. 'उन्हाळ्यात भर दुपारी.................ऊन पडते' या वाक्यात रिकाम्या जागी कोणते विशेषण वापराल ?
(1) उबदार (2) पिवळे
(3) कडक (4) कोवळे

9. खालील शब्दांपैकी पुल्लिंगी शब्दाचा पर्याय-क्रमांक लिहा :
(1) गाय (2) बैल
(3) मूल (4) बकरी

10. 'एडिसनने निरनिराळे प्रयोग केले.' या वाक्यातील क्रियापदाचा काळ कोणता ?
(1) वर्तमानकाळ (2) संध्याकाळ
(3) भविष्यकाळ (4) भूतकाळ

11. 'सारे ससे उड्या मारू लागले.' या वाक्यातील उद्देश्य कोणते ?
(1) सारे ससे उड्या (2) ससे
(3) ससे उड्या (4) सारे ससे

12. 'जल' या अर्थाचा शुद्ध शब्द कोणता ?

(1) पाणी (2) पानी

(3) पाणि (4) पणी

13. 'सुमन रोज खेळते.' या वाक्यात सुमन ऐवजी माधव हे नाव लिहिल्यास तयार होणारे वाक्य ओळखा.

(1) माधव रोज खेळतात (2) माधव रोज खेळते

(3) माधव रोज खेळतो (4) माधव रोज खेळली

14. 'मदत करणे' या अर्थाचा वाक्प्रचार निवडा.

(1) हात मिळवणे (2) हातावर तुरी देणे

(3) हात दाखवणे (4) हात देणे

15. 'अती तेथे माती' या म्हणीचा खालीलपैकी अर्थ कोणता ?

(1) जास्त खणल्यावर माती लागते

(2) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो

(3) माती लागण्यासाठी माती खणतात

(4) खाण तशी माती

**प्र. 16 ते 18 : खालील संवाद वाचून त्या खाली विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय लिहा :**

"मुलांनो, तुम्ही पुस्तके वाचता. आजच्या तासाला आपण पुस्तक कसे लिहायचे या बद्दल चर्चा करू या. आपण पुस्तक लिहिणार आहोत ते हाताने लिहिणार आहोत. त्याला 'हस्तलिखित' म्हणतात."

"गुरूजी, त्यात कोणी कोणी लिहायचे ?"

"अरे, तुम्हीच लेखक. तुम्हीच लिहायचे."

"आम्ही सगळे लेखक आहोत ?"

"होय. तुम्हीसुद्धा छान गोष्ठी कविता लिहू शकता. आपण एकत्र बसून वाचन करू. मग लिहायला घेऊ."

"गुरूजी, या हस्तलिखिताला नाव काय देऊ या ?"

"तुम्हीच सांगा बरं"

" 'रानफुलं' हे नाव देऊ या का ?"

16. हस्तलिखित कशाला म्हणतात ?

(1) हातांनी लिहिलेले (2) छापलेले

(3) वाचलेले (4) विकत घेतलेले

17. विद्यार्थ्यांनी हस्तलिखिताला कोणते नाव सुचवले ?

(1) 'फुलरान' (2) 'रानवारा' (3) 'रानफुलं' (4) 'रानातील फुलं'

18. हा संवाद कोठे घडला असावा ?

(1) मैदानावर (2) शाळेत (3) घरात (4) नदीकाठी

19. छोट्या भावाला पत्र लिहिताना कोणता मायना वापराल ?

(1) ती. सुरेश,
अनेक आशीर्वाद.

(2) चि. सुरेश,
सादर नमस्कार.

(3) चि. प्रिय सुरेश,
अनेक आशीर्वाद.

(4) चि. सुरेश,
साष्टांग नमस्कार.

**प्र. 20 ते 22 : रिकाम्या जागी योग्य शब्द निवडून सुसंगत परिच्छेद तयार करा :**

20. शाळेची घंटा झाली, शाळा.................

(1) भरली (2) सुटली (3) बंद झाली (4) संपली

21. मुले वर्गात.....................करीत होती.

(1) अभ्यास (2) गोंगाट (3) वाचन (4) दंगा

22. बाई.......................येताच मुलं शांत बसली.

(1) शाळेत (2) कार्यालयात (3) मैदानात (4) वर्गात

23. 'मेघ' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता ?

(1) ढग (2) पाऊस (3) आकाश (4) अवकाश

24. 'पराजय' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) लढाई (2) पराभव (3) जय (4) अजय

25. बाजूच्या चौकटीत कोणता पर्याय लिहिल्यास चारही अर्थपूर्ण शब्द तयार होतील ?




(1) लपट (2) टपट (3) टपाट (4) हपट

26. 'भाजी' या शब्दाला जोडून येणारा शब्द कोणता ?

(1) चटणी (2) पाला (3) लोणचे (4) मेथी

27. 'रक्षण करणारा' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या :

(1) रक्षक (2) दक्षक (3) भक्षक (4) तक्षक

28. 'जमिनीखालील गुप्त मार्ग' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या :

(1) घाट (2) खंदक (3) भुयार (4) बोगदा

29. पक्ष्यांच्या समूहाला काय म्हणतात ?

(1) कळप (2) थवा (3) रांग (4) जथा

30. वारूळात कोण राहते ?

(1) मुंगी (2) पाल (3) उंदीर (4) मधमाशी

31. अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करा :

क म ल य न न

(1) कमनयनल (2) कमलनलय

(3) कनकमलय (4) कमलनयन

32. 'जीवन' या शब्दातील अक्षरांपासून दोन अक्षरी किती शब्द तयार होतात ?

(1) एक (2) दोन (3) चार (4) शून्य

33. 'नाटकातील सुदाम्याचे पात्र मुलांना आवडले.' या वाक्यातील 'पात्र' या शब्दाचा या वाक्यातील अर्थ कोणता ?

(1) भांडे (2) योग्य

(3) नदीचा प्रवाह (4) नाटकातील भूमिका

34. डोळे, मान, कान, दात हे शब्द वर्णानुक्रमे लावल्यास पहिला शब्द कोणता येईल ?

(1) दात (2) मान (3) डोळे (4) कान

35. 'नेताजी' ही पदवी खालीलपैकी कोणाला मिळाली आहे ?

(1) जवाहरलाल नेहरू (2) वल्लभभाई पटेल

(3) सुभाषचंद्र बोस (4) जगदीशचंद्र बोस

## भाग II

### सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल)

36. शिवजन्मापूर्वी अहमदनगरवर कोणाची सत्ता होती ?

(1) कुतुबशाह (2) आदिलशाहा

(3) मुघल बादशाहा (4) निजामशाहा

37. शिवरायांचा जन्म.................या किल्ल्यावर झाला.

(1) रायगड (2) शिवनेरी

(3) प्रतापगड (4) तोरणा

38. शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्याचा प्रमुख..............हा होता.

(1) बहिर्जी नाईक (2) निराजी रावजी

(3) अण्णाजी दत्तो (4) दौलतखान

39. शायिस्तेखानाच्या पराभवानंतर, औरंगजेबाने त्याची रवानगी कोठे केली ?

(1) कर्नाटक (2) बिदर

(3) बंगाल (4) गोवळकोंडा

40. पुरंदरचा तह कोणाकोणांत झाला ?

(1) शिवराय—मिर्झाराजे (2) शिवराय—सिद्‌दी जौहर

(3) शिवराय—आदिलशाहा (4) शिवराय—निजामशाहा

41. शिवरायांच्या मुलकी व्यवस्थेत, परगण्यावर.................हा अधिकारी असे.

(1) सुभेदार (2) जुमलेदार

(3) शिलेदार (4) हवालदार

42. २६ जानेवारी या दिनास...............असे म्हणतात.

(1) प्रजासत्ताकदिन (2) स्वातंत्र्यदिन

(3) ध्वजदिन (4) महाराष्ट्रदिन

43. लोकांनीच आपला राज्यकारभार करणे, याला .................... असे म्हणतात.

(1) जमीनदारी (2) राजेशाही

(3) लोकशाही (4) वतनदारी

44. आपल्या देशाच्या राष्ट्रध्वजाचा आकार कसा आहे ?

(1) आयताकृती (2) वर्तुळाकृती

(3) चौरसाकृती (4) त्रिकोणाकृती

45. पृथ्वीला स्वत:भोवती एक फेरी पूर्ण करण्यास सुमारे .................... तास लागतात.

(1) २० (2) २४

(3) १२ (4) २२

46. जर नागपूर : संत्री, तर रत्नागिरी : .................... .

(1) केळी (2) चिकू

(3) द्राक्षे (4) हापूस आंबा

47. महाराष्ट्रातील प्रसिद्ध अणुविद्युत केंद्र .................... येथे आहे.

(1) कोयना (2) राधानगरी

(3) तारापूर (4) भाटघर

48. खालील चित्रातील वाद्य ओळखा.



(1) शिंग (2) पुंगी (3) किनरी (4) तारपा

49. महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला कोणता सागर आहे ?

(1) बंगालचा उपसागर (2) हिंदी महासागर

(3) अरबी समुद्र (4) पॅसिफिक महासागर

50. सागरसंपत्तीशी संबंधित नसलेले, उत्पादन कोणते आहे ?

(1) मीठ (2) मासे

(3) नैसर्गिक वायू (4) चुनखडक